१९६७
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
ग्रं. क्र. १६४४

# पुनवेचा चंव

१६७८
REFBK-0011969
REFBK-0011969

मधुकर केचे

# पुनवेचा थेंब

मधुकर केचे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
REFBK-0011969
REFBK-0011969

पॉप्युलर बुक डेपो, मुंबई ७

पॉप्युलर प्रकाशन

© मधुकर केचे

प्रथम मुद्रण :
१५ ऑगस्ट १९६१
२४ श्रावण १८८३

मुद्रक :
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार
मुंबई २

प्रकाशक :
ग. रा. भटकळ
पॉप्युलर बुक डेपो
लॅमिंग्टन रोड
मुंबई ७

“ बाळ म्हणालें ‘आई’
मी गंगेंत बुडालें ”

या ओळींमधल्या

सौ. शिरीष पै
यांना अर्पण

# प्रस्तावना

'पुनवेचा थेंब' हा प्रा. मधुकर केचे यांचा दुसरा काव्यसंग्रह. 'दिंडी गेली पुढें' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह जेव्हां मीं वाचला, तेव्हांच मराठी काव्यक्षितिजावर एक नवा तारा उदयास येत असल्याचा मला प्रत्यय आला. 'पुनवेचा थेंब' संग्रह वाचून त्या प्रत्ययास बळकटी आली.

हे दोन्ही संग्रह वाचून मनावर ठसा उमटतो, तो हा कीं, केचे हे सश्रद्ध कवि आहेत. श्रद्धाहीनतेच्या या युगांत तिशींतला उच्च विद्याविभूषित प्राध्यापक कवि श्रद्धावान् असावा, याचें कदाचित् कुणास आश्चर्य वाटेल! पण केचे यांचा पिंड व त्यांच्या घराण्याचे संस्कार लक्षांत घेतले, म्हणजे असें आश्चर्य वाटावयास नको. केचे यांचे वडील भक्तिमार्गी होते आणि स्वतः केचे यांनीं एकदां पंढरपूरची पायीं यात्रा केली होती, या दोन गोष्टी नमूद केल्या, म्हणजे याबाबतींत अधिक विस्तार करावयास नको. त्यांची काव्यगत अनुभूति प्रामाणिक आहेच व तेवढी कवितेच्या रसग्रहणास पुरेशी आहे; पण ही काव्यगत अनुभूति त्यांच्या प्रत्यक्ष जीवनानुभूतीशीं संवादित्व राखणारी आहे, हें विशेष आहे.

नोबेल पारितोषिक मिळालेले सध्यांचे सर्वश्रेष्ठ इंग्रजी कवि टी. एस्. इलियट हे कट्टे कॅथोलिक असून त्याची त्यांच्या काव्यावर कांहीं स्थलीं छाया पडली आहे. त्यांच्याहून बरेच लहान असणारे रॉबर्ट लॉवेल (जन्म १९१७) हे दुसरे श्रेष्ठ कवि तर धार्मिक कवि म्हणूनच गणले जातात. या परकीय कवींना धार्मिकतेबद्दल जर आपण नाक मुरडीत नाहीं, तर स्वकीय कवींनाच तें तसें कां मुरडावें? कवीच्या धार्मिक, सामाजिक व राजकीय मतांमुळें बिनचूक न जातां खऱ्या रसिकानें त्याच्या काव्याकडे निर्लेप दृष्टीनें पाहिलें पाहिजे. इकबाल यांचीं 'शिकवा' व

'जवाबे शिकवा' हीं काव्यें कमालीचीं जातीय असूनहि त्यांच्या विलक्षण ओजोगुणामुळें तीं रसिक मान्य झालींच ना? एझ्रा पौंड यांच्या 'Cantos' मध्यें क्वचित् ज्यूंचा द्वेष उमटला आहे, एवढ्यासाठीं रसिकांनीं त्या महान् प्रदीर्घ कृतीला त्याज्य मानलें नाहीं!

'पुनवेचा थेंब' संग्रहांत 'विठ्ठल' किंवा 'पांडुरंग' शब्द अनेक ठिकाणीं आला आहे. पण हा शब्द सर्वच जागीं विशिष्ट देव या अर्थानें आला नसून त्याची कक्षा कवीनें कित्येक स्थलीं निश्चितच वाढविलेली आहे! यावरून केचे यांची भक्तिभावना मर्यादित वा संकुचित् नसून व्यापक स्वरूपाची आहे, हें स्पष्ट होईल. एरवीं तरी गीतेंत म्हटलेंच आहे:—

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा।
तत्तदेवागच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम्॥ (१०.४१)

या गीतावचनाचा केचे यांनीं अवलंब केलेला दिसतो.

भक्तिपर काव्यासाठीं अभंग छंद वापरण्यांत केचे यांनीं मोठेंच औचित्य दर्शविलें आहे. प्राचीन मराठीचें अभंग-वाङ्मय हें अनर्घ्य रत्न होय. भावना आहेत, पण भावगीत नव्हे आणि त्रुटित आहे, पण अपुरें नव्हे—असा अभंग हा मराठींतील वैशिष्ट्यसंपन्न काव्यप्रकार होय. लिओनार्ड जॉन सेज्विक याच्यासारख्यानें अभंग-वाङ्मयाची 'जगांतील अत्युत्तम साहित्यां'त गणना केली आहे! अर्वाचीन काळीं मराठींत अभंगरचना करणारे कांहीं कवि झाले. पण उत्कृष्ट भक्तिपर अभंग लिहिणारे म्हणून ना. वा. टिळक यांच्यानंतर केचे यांचाच नामनिर्देश करावा लागेल, असें मला वाटतें. केचे यांनीं अभंग छंदा-प्रमाणेंच इतर पद्यप्रकारांतहि भक्तिपर रचना केली आहे, हेंहि या संदर्भांत सांगून टाकावयास हवें.

केचे यांना भक्तिकाव्यांत प्रियकर प्रेयसीच्या संबंधाची प्रतिमा वापरणें विशेष आवडतें आणि तें आपल्या परंपरेस धरूनहि आहे. 'नारदभक्तिसूत्रां'तील ८२ व्या सूत्रांत 'कांतासक्ति' सांगितली असून

भागवताच्या दशम स्कंधांतील गोपीप्रेम प्रसिद्धच आहे. ज्ञानदेव-तुकारामच्या 'विराण्यां'त हाच भाव आहे. सूफी पंथांत प्रियकर–प्रेयसीच्या नात्याची उलटापालट झाली आहे. त्यांत ईश्वर हा माषुक असून भक्त हा आषक असतो. माषुकांत स्त्री असते, तसाच कोंवळा पोरगाहि असतो! विदर्भीय संत गुलाबरावमहाराज कात्यायनी व्रताचें आचरण करीत असत, म्हणजे पत्नीभावानें ईश्वरभक्ति करीत असत. या सर्वांचा केचे यांच्यावर कमी–जास्त परिणाम झाला असावा.

केचे यांच्या भक्तिकाव्यांत आर्द्रता तर आहेच, पण त्यांत शक्य तेथें नावीन्यहि आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. सहज नजरेस येणारीं काव्यें म्हणून 'झेप,' 'हारवतां,' 'तुझी माझी भेट'–वगैरे कवितांकडे अंगुलिनिर्देश करतां येईल. उल्लेख केलेलीं हीं तीन काव्यें या संग्रहांतील सर्वोत्तम कृतींत अंतर्भूत होतात. केचे यांच्या काव्यांत हें नावीन्य नसतें, तर त्यांना संतकाव्याच्या केवळ प्रतिध्वनीचेंच रूप आलें असतें! तसें झालें नाहीं, यांतच केचे यांच्या भक्तिकाव्याच्या यशाचें रहस्य आहे.

या संग्रहांत भक्तिपर काव्यांखेरीज इतर विषयांवरीलहि कांहीं काव्यें आहेत. रसिकतेला मर्यादा पडल्यामुळें ज्यांना भक्तिकाव्यांत रस वाटत नसेल, त्यांची सोय या अन्य काव्यांमुळें होईल ! अशा काव्यांत 'झिंग्या भोई' व 'पीवाडी' हीं दोन काव्यें मला आवर्जून निर्देश करण्याजोगीं वाटतात. पहिल्या काव्यांत झिंग्या भोयाची कहाणी चटकदार रीतीनें सांगितली आहे. झिंग्याचें व्यक्तिदर्शन, वऱ्हाडी बोलीचा समुचित उपयोग व अद्भुतरम्यता हीं या काव्याचीं वैशिष्ट्यें होत. 'पीवाडी'मधील मुसलमानी वातावरण असेंच वैशिष्ट्यपूर्ण आहे. मुसलमानबंधूंविषयीं मराठी काव्यांत सहानुभूतीनें फारच थोडें लिहिण्यांत आलें आहे ! या दिशेनें अल्प उपक्रम म्हणून केचे यांनीं स्वतंत्र रीत्या केलेल्या या उपक्रमाचें मला फार मोल वाटतें.

वर मला आवडलेल्या कांहीं कवितांचा नामनिर्देश येऊन गेला आहे. त्यांत आणखी भर घालावयाची तर, 'चुळबूळ,' 'धागा,' 'मीरा,'

'वावडी,' 'रंग' – यांसारख्या कवितांचा उल्लेख करावा लागेल. 'रंग' कविता वाचून 'भुलाबाई'च्या गाण्यांपैकीं 'एक लिंबू खेळूं बाई' या गाण्याची आठवण होईल. या संग्रहांतील कवितांमधील किरकोळ सौंदर्याचा परामर्श घेणें स्थलाभावीं शक्य नाहीं. केवळ नमुना म्हणून 'साय पांघरून । दूध गेलें झोंपी' या सुंदर कल्पनेचा व 'चुलत आंसवें' या मार्मिक शब्दप्रयोगाचा तेवढा उल्लेख करतों. केचे यांना मुक्तछंदाचेंहि वावडें नाहीं, असें 'पारधी', 'चोरी' कवितांवरून निदर्शनास येतें,

शेवटीं थोडें दोषदिग्दर्शन करणेंहि अगत्याचें आहे : 'रुपाचा' (पान ७४), 'पुण्यविरांच्या' (पान ७०) – यांसारखीं अशुद्ध रूपें टाळावयास हवीं होतीं. 'उन्ह' शब्द (पान ९०) ते जोडाक्षरासारखा वापरतात, पण तो तसा नाहीं. 'वळवाच्या सरी' मधील अखेरच्या चार ओळींतील छंदोवैचित्र्य मला पटतें. पण चौथ्या ओळींत, पहिल्या तीन ओळींप्रमाणें, आठ अक्षरें नसून सात अक्षरें येतात, हें मात्र मला खटकलें! 'रति' कवितेंतील शेवटल्या कडव्यांतील उत्तानतेबद्दल मला नापसंती दर्शविणें प्राप्त आहे !

प्रस्तावना संपली. वस्तुतः तिची प्रस्तुत संग्रहास आवश्यकता नव्हती. एक तर, प्रा. केचे हे कवि या नात्यानें महाराष्ट्रास सुपरिचित आहेत आणि दुसरें, त्यांच्या या संग्रहांतील कविता टीपा-टिपणीखेरीज वाचकांना सहज कळतील – रुचतील, अशा आहेत. तथापि एका नवोदित प्रतिभेचें; स्वागत करण्यासाठीं चार पावलें सामोरा जावें, एवढ्याच उद्देशानें मीं हे चार शब्द लिहिले आहेत. वाचकांनीं – व स्वतः कवीनेंहि – त्यांच्याकडे याच दृष्टीनें पाहावें, अशी त्यांना विनंति आहे.

खामगांव
(विदर्भ)
ता. ४ – १० – १९६१

**वामन नारायण देशपांडे**

# आभार

आधींचा ‘ दिंडी गेली पुढें ’ आणि हा ‘ पुनवेचा थेंब ’ या दोन्ही काव्यसंग्रहासाठीं मला श्री. रामदास डांगे, श्री. देवराव उदापुरे व श्री. भाऊ सुर्वे यांची खूप मदत झाली.

अमरावतीचे कविमित्र श्री. शरच्चंद्र सिन्हा, सुरेश भट, प्रा. वैद्य यांचाहि मी आभारी आहें.

‘ दिंडी ’ व ‘ थेंब ’ यांच्या प्रकाशनाची जबाबदारी अत्यंत आपुलकीनें आपल्यावर घेऊन माझें कौतुक करणाऱ्या प्रकाशकांचा मीं सदैवच बांधलेला आहें.

मधुकर केचे

राज महाविद्यालय
अमरावती.

# ऋणनिर्देश

'पुनवेचा थेंब' या संग्रहांतल्या कृति बऱ्याचशा अप्रकाशित आहेत. कांहीं महाराष्ट्रांतील विशेष व मासिक अंकांमधून प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यांतले उल्लेखनीय – दीपावली, हंस, प्रतिष्ठान, तरुण भारत ( पुणें व नागपूर ), महाराष्ट्र, गुरुदेव, साधना, युगवाणी, सुषमा, वीणा सत्यकथा, नवयुग, इ.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 3५.४११ वि: ०२।०८।२५
क्रमांक ९६-४-४ नों वि:
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११९६६

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | पुनवेचा थेंब | १ |
| २ | भेट | २ |
| ३ | देणगी | ३ |
| ४ | कोंभ | ४ |
| ५ | परत | ५ |
| ६ | शब्द | ६ |
| ७ | मोर | ७ |
| ८ | रंग | ८ |
| ९ | ओरड | १० |
| १० | समारोह | ११ |
| ११ | भूक | १२ |
| १२ | नातें | १३ |
| १३ | हांकेसाठीं | १४ |
| १४ | वासना | १५ |
| १५ | नाच | १६ |
| १६ | अभिसार | १७ |
| १७ | रति | १८ |
| १८ | रग | १९ |
| १९ | सोस | २० |
| २० | पंगत | २१ |
| २१ | सहज | २२ |
| २२ | जळण | २३ |

२३ गांठोडें २४
२४ वारी २५
२५ वारीपेरी २७
२६ निरोप २८
२७ लळा २९
२८ आण ३०
२९ लोभ ३१
३० केका ३२
३१ मरण ३३
३२ तुझी माझी भेट ३४
३३ सोहळा ३५
३४ पिसें ३६
३५ चुळबूळ ३७
३६ यमक ३८
३७ गाणें ३९
३८ मासोळी ४०
३९ वावडी ४१
४० संताचें जीवन ४२
४१ लेखन ४३
४२ काळ ४४
४३ काय खरें मग ? ४५
४४ आपण दोघें ४६
४५ गौरव ४८
४६ मुक्ता माझी ४९
४७ शेपूटतुस्या ५०
४८ वठलीहि माती ५१

४९ ठेच ५२
५० वेसण ५४
५१ हारवतां ५५
५२ कोश ५६
५३ उपकार ५७
५४ मायबाप ५८
५५ ओतप्रोत ५९
५६ नको ६०
५७ अब्रू ६१
५८ काडीमोड ६२
५९ पाहुणा ६३
६० वाचला मी गाथा ६४
६१ दावणीस ६५
६२ पावसाळा ६६
६३ धागा ६७
६४ भूत ६८
६५ झेप ६९
६६ मीरा ७०
६७. तो ७२
६८ माझी फुलवणी झाली ७३
६९ पारधी ७४
७० चोरी ७५
७१ वळवाच्या सरी ७६
७२ उरलेलें ७७
७३ उरतें गाणें तरी ७८
७४ रामघटीला ७९

| | | |
|---|---|---|
| ७५ | पीरवाडी | ८१ |
| ७६ | अकाळणी | ८३ |
| ७७ | गजरा परका | ८४ |
| ७८ | मोतीपोहे | ८५ |
| ७९ | हवेंहवेसें | ८६ |
| ८० | डहाळी | ८८ |
| ८१ | गुढी | ८९ |
| ८२ | पहाट न्हाते | ९० |
| ८३ | बांध | ९१ |
| ८४ | अंगाई | ९२ |
| ८५ | आढावा | ९३ |
| ८६ | अंधुक | ९४ |
| ८७ | झिंग | ९५ |
| ८८ | श्रावण | ९७ |
| ८९ | गढी | ९८ |
| ९० | झिंग्या भोई | ९९ |
| ९१ | अंगारा | १०७ |

## पुनवेचा थेंब

सवतीच्या दारीं
उभा पारिजात
सडा अंगणांत  रखुमेच्या.

दिव्यानें किटला
गाभाऱ्याचा खांब
पुनवेचा थेंब  माझ्या डोळीं.

मूर्तीच्या कोंदणीं
आभाळाची ठेव
वैकुण्ठ वर्षाव  माझ्यावरी.

तीर्थीचें चांदणें
येथल्या चकोरा
भाव मज बरा  रखुमेचा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...................... वि: ........ ..........
क्रमांक ...................... नों दि ..............

# भेट

माझ्या जखमेच्या अंशा
घोर वादळाच्या वंशा
असशील कोठेंतरी
अनोळखी शब्दांतरीं.

तुला भेटायास माझे
एक जळजळे आर्त
माझ्या भिकार गाण्यांत
नाहीं कधींच का अर्थ ?

नेणे कुठला तूं कोण
काय तुझें-माझें गोत ?
आवरतां आवरेना
परी शोधण्याचें व्रत.

नातें कळण्याच्या आधीं
जुळे तुझी माझी व्याधी
हाच आपुला एकोपा
माझ्या लेका किंवा बापा.

घडो न घडो आपुलें
देह-फोडतें मीलन
माझ्या मातींतहि कुढो
तुझ्या पावलांचें ध्यान.

## देणगी

जाणूं नये तें जाणिलें
हेंच व्याधीचें कारण
डोळे मिटतां न आले
झोंबे उजेडाचा कण.

मज लाभो त्यांचा वांटा
भल्या आंधळ्यांचें भाग्य
घाणी शेणांत राहून
मिळे किड्यास आरोग्य.

जळावीण मासा मरे
आणि जळामध्यें मीहि
तुझ्या देणगीनें फाटे
माझी अंधाराची झोळी.

# कोंभ

जितकें दिसेल
तितकें पाहीन
तर्कानें जाणीन  उरलेलें.

चाललों तयाची
वाहून शपथ
पुढचा मी पथ  दाखवीन.

पुरे इतुकेंहि
झरोक्यांत नभ
अनंताचा कोंभ  वाढवोन.

# परत

चढाहूनहि हा
उतार बिकट
परतीची वाट  चालवेना.

आजपावेतोंची
किती पापपुण्यें
त्यांशीं ओलांडणें  महाभारी.

सोडलेला ठाव
राहे डोळ्यांआड
पुढचीच खोड  बरी आतां.

# कोंभ

जितकें दिसेल
तितकें पाहीन
तर्कानें जाणीन  उरलेलें.

चाललों तयाची
वाहून शपथ
पुढचा मी पथ  दाखवीन.

पुरे इतुकेंहि
झरोक्यांत नभ
अनंताचा कोंभ  वाढवोन.

# परत

चढाहूनहि हा
उतार बिकट
परतीची वाट  चालवेना.

आजपावेतोंची
किती पापपुण्यें
त्यांशीं ओलांडणें  महाभारी.

सोडलेला ठाव
राहे डोळ्यांआड
पुढचीच खोड  बरी आतां.

## शब्द

तुवां ऐकला का शब्द
देठ सुगंधाचा होता
विरघळला कुठें तो
असा खुडतां खुडतां.

त्याशीं आतां धुंडाळतां
होई अशी धावपळ;
तसा जुळेना म्हणून
लिही इतुके पाल्हाळ.

# मोर

मोरापरी ऐसें
नाचलें मरण
रंग उभारून जन्मावरी.

भाग्यवान माझा
धुळीचा पिसारा
येरे नाच मोरा मेघाआधीं.

# रंग

एक रंग झेलूं गडे
दोन रंग झेलूं
श्रीरंगच झेलूं जातां
देह कशी तोलूं?
निळ्या निळ्या आभाळांत
चुंबनांची दाटी
विराणीच्या गालीं चढे
निळीच रंगोटी.
भिजलेले ओठ माझे
काय कशी बोलूं?
एक रंग झेलूं गडे
दोन रंग झेलूं.

सावळ्याचा मेघ झडे
विजू माझी खेळे
तुषारलें अंग अंग
पाझरलें पोळें
मिठीमाजी मिटलेले
डोळे कसे खोलूं?
श्रीरंगच झेलूं जातां
देह कशी तोलूं?

अंकुरलें गीत लेई
अमृताचा बाणा
फोफावलें – अनन्ताचा
खांदाहि ठेंगणा
उरीं असे गीत कशी
तालावरी चालूं?
एक रंग झेलूं गडे
दोन रंग झेलूं
श्रीरंगच झेलूं जातां
देह कशी तोलूं?

# ओरड

नभावेगळी निळाई
तैसें खोटें माझें मन
बसे शाईत येऊन लिहितांना.

जिला कोकिळेची कूस
रात सावळी निवान्त
राही अंडें उबवीत भावनांचें.

पडे बाहेर रूपडें
स्वताहूनहि थोराड
माझ्या पिल्लांची ओरड 'काव काव'

# समारोह

होतां माझी भेट
एका नागव्याशीं
झाली बाचाबाची थोडीफार

दिसूं नये ऐशा
ओंगळ अंगांची
जाण दिली त्याशीं रागेजून.

वेड्याचा परन्तु
उलटा कांगावा
अजून नागवा नाहीं म्हणे.

मग एका दिनीं
फाडोनिया देह
त्यानें समारोह पुरा केला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों वि ..................

## भूक

मुंगीच्या भुकेनें
खाईं मी विठ्ठल
तरी तो अट्टल अंग चोरी.

आपुल्या पाळींत
मात्र शिरजोर
सारेच हे ऊर मटकावी.

# नातें

आठवेना जरी
कुठला तूं कोण
ओढ ओढे मन   मायबळें.

चुटूचुटू ओठ
वाजतात पानें
माझ्याच रोखानें   वारा वारा.

मीहि असा पिसा
पुरुष असून
दूध छातींतून   सांडों पाहे.

असशील तेव्हां
तसाच आजही
नाकारत नाहीं   नातें तुझें.

# हांकेसाठीं

शेवटची हांक
तुलाच मारीन
आभाळें फोडीन   ओरडून

तुझ्या चरणांची
करावया उशी
लावीन पणाशीं   विश्व माझें

यायचें ये – राहो ;
नकोही येऊंस
उरू देई श्वास   हांकेसाठीं

## वासना

तुवांच दिली ही
मिठीची वासना
माझ्या कणाकणा चेतवून.

मावळशी आतां ;
तरी उभें नभ
उषेचा हिशेब चुकवाया

डोळ्यांचें डोळ्यांना
लाभेलच जग
काळोखाची रग वितळून.

# नाच

इतुकें नाचणें
पडलें न पुरे
नादती नूपुरें तोडलेलीं

वावटळ घेई
तालांत उसळी
नाचे सोनसळी पतझड

पुन्हां पागोऱ्यांनीं
भरलीसे ओटी
शब्द माझ्या ओठीं पोटांतले

तुझाच महिमा
चालली राहाटी
नाच नाचापाठीं जोर करी

# अभिसार

मीरेनें म्हटलें
येणार तूं घरीं
म्हणून श्रृंगारी   देहमन.

चितारावी किती
निरंगेच्या वक्षीं
पुनवेची नक्षी   फिकी पडे.

काय नेसूं आतां
न पुरे हें नभ
अवयवा कोंभ   नवेनवे.

पिंडास फोडून
गाजे ज्योतिर्लिंग
आनंदाचा संग   कोर झाला.

अभिसार आतां
राहूं दे अपुरा
झेल ही अधीरा   गिरीधरा.

थिटे भूमंडळ
शयनाचें सोंग
बाहूंचा पलंग   बरा बरा.

# रति

तुझ्याच मापाचें
मज दें शरीर
भक्तीहून थोर  रति व्हाया.

आलिंगाया मज
येशील जेधवां
झांकूनहि देवा  उसळेन.

हुंगण्यास तुझ्या
अंगींचे फुलोल
माझेंहि जन्मेल  नाक तेव्हां.

देई असा दिव्य
कोमळाचा स्पर्श
ज्यांत वीर्यनाश  संभवेना.

# रग

राहतां न राहे
कोंडलेली रग
अंगीं भेग भेग    उद्रेकाची.

जागतां आंतून
तडकतें अंडें
जीवन मुसंडे    पोटापार.

तुझ्या मूर्तीचेंही
कवच टणक
तैसें आपसूक    टिको यावें.

# सोस

मींही आकसली मिठी
तुझें पांगतांना अंग
असा थोड्याचा थोड्याशी
कधींमधींचा प्रसंग.

कांहीं इथें कांहीं तिथें
असा असशील पुरा
उजेडाच्या पुढें मागें
माझा अंगारा–निखारा.

जेवढ्यास मी तेवढा
पूर मृगाच्या तोलाचा
मात्र उरलेल्या उरीं
सोस तुझ्या सर्वांगाचा..

## पंगत

परन्तु होतांना
वैऱ्यांशीं प्रसन्न
तुझें थोरपण थोर होतें.

पावन करतां
नेहमींचा भक्त
तुझी जाहिरात थिटीथोटी.

पोटच्या पोराशीं
असा पंक्ति-भेद
जळो तुझा वेद रेड्यामुखीं.

## सहज

तुझ्या सहजपणींचे
उमगूनही इशारे
समजावितों मातीस
हे तो वैशाखाचे वारे
हें तों सहजच सारें...

# जळण

सर्वांगीं भडका
बघा दिव्य शोभा
आग पांडुरंगा     लागलीसे !

कुण्या विराणीची
एक एक ओळ
तसा त्याचा जाळ     नाचे फुले.

वारकऱ्यापरी
जळते पालखी
मला आपुलकी     निखाऱ्यांची.

येरे गाथावाल्या,
फळे तुझा भाव
तुझ्यासवें देव     जळूं लागे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों दि ..............

## गांठोडें

माझ्या मजपाशीं
पापपुण्यराशी
काशी वाराणशी दूर राहे.

गंगूच्या मायेस
एकदां चाखेन
ऐसें माझें मन जीभ चाटी.

जाळोनी गांठोडें
भस्मीं रमवीन
जागरांत स्वप्न शिवराती.

दूर दूर पण ;
गंगा गंगाधर
गांठोडें तोंवर भार माझा.

# वारी

१

केला वारीचा निर्धार
एका मातीमोल राती
विठूरंगी काळा घोर
होता अंधार सोबती

२

जे जे बोलविते धनी
त्यांना शोधलें मीं व्यर्थ
शब्द नव्हते म्हणून
झरे आसवांत अर्थ

३

झाले आभाळ अनाथ
चोंच वांसे माझ्या दारीं
त्याच्या माझ्या पोटासाठीं
चाले कंगालाची वारी

४

आतां फक्त धागा हवा
साऱ्या मेळल्या फुलांना
माळ माळेनें शोभेल
सुकतांना गळ्याविना

५

वारी वाऱ्याच्या रक्ताची
फिरे थांबे फिरे तरी
पायापासून पळते
वाट कळीची सोयरी

# वारीपेरी

केला अंधारीं उदीम
मनीं पेरलें आभाळ
जसें देवकीचें मन
मेघ झरे सर्व काळ

एका भक्तिपोटीं येती
देव तेहतीस कोटी
अनन्ताचीच मानून
माजूं दिलीं मीं रोपटीं

पाचारिले संतजन
'अहो, पिकले विशाल!'
परी हंगामाच्या हातीं
कडू भोपळ्यांची माळ

असा आंधळ्या पेरीचा
तुटे तेजापून नाळ
तेव्हांपासोनिया झाले
मुके माझे झांज टाळ

# निरोप

नागवलों त्याचा
उण नाहीं बोल
पिटला न ढोल भलाईचा

झालें केलें त्याची
एवढी दे ओल
निरोपाचें मोल पापणींत

# ळळा

उगी राह्य विठे आतां
नको लाडावूंस बाळ
चटावतां तुझ्या दारीं
येथें मातेल आबाळ.

पाजशील कांहींबाहीं
आणि फेकशील दूर
मग पडेल पिल्लास
माझ्या स्तनांचा विसर.

लेकराचा पोरपणा
त्याला लागे तुझा ळळा
वांझोटीनें जोडूं नये
असा कुशीचा उमाळा।

# आण

साय पांघरून
दूध गेलें झोपीं
तशी धापाधापी थांबो माझी.

उतूं जाई मन
न पुरे तुफान
जगणें इंधन झालें असे.

जळते ही वारी
आतां न साहवे
अनन्ताच्या कवे ! आण तुझी.

# लोभ

ज्यानं मेघावलें
आषाढाचें मन
मज त्याची जाण जन्मोजन्मीं.

थेंबोथेंबीं पूर
दयेचीं आंसवें
माझ्या मातीसवें मिठी त्याची.

हांक ऐकलीसा
वर्षवी जो नभ
त्याचा मज लोभ गर्भापरी.

# केका

वेगळाल्या वाटा
दुभागे नशीब
एक लाभें जीभ ; एका वाचा.

मौनांतच विरे
दोघांचेहि भाव
तिथे अडे धाव पायाविना.

दोन्ही वाटा पुन्हा
भेटो एकमेकां
मोरामुखीं केका खुलवाया.

# मरण

मर म्हणतां न मेला
जगण्याशीं सौदा केला
असा जन्म वायां गेला प्रेताचाहि.

आता तरी शहाणून
जावें विठूशीं शरण
जेथें मागतां कल्याण मृत्यु लाभे.

जीवनांत या नातरी
राखा पुरेशी शिदोरी
जेणें मुडद्याची दोरी विठोभोतीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................... वि: ....................
[illegible] .................... नों. दि ....................

## तुझी माझी भेट

तुझी माझी भेट :
फांदीस जुळते
पाचोळ्याचे देठ.

तुझी माझी भेट :
नभास झोंबती
वादळाचे ओठ.

तुझी माझी भेट :
मृगजळामाजी
भिजे माझा कांठ.

तुझी माझी भेट :
मरत्या क्षणाचे
जीवन अफाट.

# सोहळा

अवघ्या पंथांनीं
उगारल्या झेंड्या
देऊन गचांड्या दूर केलें.

कोणत्याहि मेळी
असा उणा वाण
निघालों जेथून तेथें उभा.

पुढल्या पताका
गेल्या विखरून
समजेना कोण कुठें गेले.

पांगलेल्या वाटा
जेथें होती गोळा
तेथचा सोहळा पाहूं दे गा.

## पिसें

शेंडा ना बुडूख
असें माझें दु:ख
अनोळखी राख.

अनोळखी ; तरी
वाटे आपलेंसें
मज तुझें पिसें

## चुळबूळ

मातीमोल जिणें
जाईल सरून
बियामध्यें मन ठेवोनिया.

मग मल्हाराचा
वाजतां मृदंग
अंकुराचें अंग झेपावेल.

इवली पोपटी
त्याची चुळबूळ
कवेंत आभाळ घ्यावयाशीं.

तेव्हां न करावी
आदळआपट
त्याचे पटापट मुके घे जो.

## यमक

ऐसा कासाविस
काहिले ही कळ
वाटे हें वादळ तुला दिसो.

देहाचे मनाशीं
न जुळे यमक
दुःखाहून दुःख हेंच माझें.

# गाणें

नाहीं लाभले ग वाचे !
मज कान विठोबाचे
ओठीं अडलें भजन
तान्हा राही मातेवीण.

भक्तिमाजी नाहीं देव
जळीं जळाचा न ठाव
ऐसे नाहीं नाहीं होणें
वाचे सोडूं नये गाणें.

# मासोळी

एकपणासाठीं
नोहे तळमळ
दुःख हें केवळ दुराव्याचें.

हवे मला जरी
भेटण्याचें बळ
मासोळीच जळ होऊं नये.

# वावडी

रूप पाहीन लोचनीं
हीच बाळगली आस
आस चेतोनिया भास तुझा झाला.

भास भासच, दर्शन
तेंहि इतुकें लहान !
नाहीं नवीन महान त्यांत कांहीं.

आजवरी भोगलेले
उन्हापावसांचें भान
तूंहि दिसशी गुंतून तयांतचि.

रोजच्या या जगापार
तुझा वेगळा आकार
असा संतांचा उच्चार वायां ठरे.

जुनें नभ ओलांडून
जाये भासाची वावडी
माझ्या डोळ्यालागीं उडी देई तैसी.

# संतांचें जीवन

हा रे, संतांचें जीवन
रडे फुंदे रातदिन
परी येतांच विमान भुर्र जाती.

भुर्र जाती बेपर्वून
मागें ठेवती भजन
त्यांचा वारसा चालून वाढायाशी.

मरतांनाही विंचवी
वाढे पोरक्यांचा वंश
लेकरांना चढे दंश भजनाचा.

## लेखन

कोणाच्या चालीनें
मीहि बिघडलों
लिहाया लागलों   राखेजून.

राहे कासाविशी
सावलीची गत
राखेच्या उरांत   आग जैसी.

कोणाच्या सांगीनें
चालली ही वारी
शब्द आतांतरी   अर्थेल ना ?

## संतांचें जीवन

हा रे, संतांचें जीवन
रडे फुंदे रातदिन
परी येतांच विमान भुर्र जाती.

भुर्र जाती बेपर्वून
मागें ठेवती भजन
त्यांचा वारसा चालून वाढायाशी.

मरतांनाही विंचवी
वाढे पोरक्यांचा वंश
लेकरांना चढे दंश भजनाचा.

## लेखन

कोणाच्या चालीनें
मीहि बिघडलों
लिहाया लागलों   राखेजून.

राहे कासाविशी
सावलीची गत
राखेच्या उरांत   आग जैसी.

कोणाच्या सांगीनें
चालली ही वारी
शब्द आतांतरी   अर्थेल ना ?

# काळ

कालाच्या ओघांत
तुकोबा तरला
इंद्रायणीजला    मान नोहे.

विज्ञानाच्या युगीं
देऊळ खचलें
तरीहि उरले    भक्तिभाव.

धन्य आज ज्यांच्या
ओठांवरी गाथा
त्यांचे पायीं माथा   विठोबाचा.

## काय खरें मग ?

ग्रीष्मर्तुची जळती माती
        मिथ्या का ही ?
ती खोटी तर
        खोटा तूंहि !

खोटें जर हें जळणारें जग
        काय खरें मग ?
तहानलेल्या   मातीमधली
खोटी का रे   माझी तगमग ?

वर्षाआतुर   नभासारखी
मीलनवेडी,   कोसळणारी
खोटी का रे   तुझ्यांतली रग ?

        काय खरें मग ?
        काय खरें मग ?

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों दि ..................

# आपण दोघें

तृप्तीच्या तंद्रींत
सोडवी हळूच
अनन्त कुणाची
सावळी मिठी ?

लुपल्या प्रीतीचा
तरीहि बोलतो
सुगंधी पुरावा
वाऱ्याच्या ओठीं

आपुल्या नादांत
प्राजक्त घालतो
रक्तिम देठांच्या
स्वप्नांचा सडा

तशाच लालस
लोभस लाजेंत
रंगत असते
नभाची कडा

अमृतझरत्या
कोवळ्या क्षणांना
भेटत असतों
आपण दोघें

असंख्य दंवांचें
म्हणून दुबळें
अपुरें जीवन
सार्थकीं लागे

## गौरव

योगायोगानेंच फक्त
रडलों मी संतांसवें
अशीं चुळत आंसवें     वरपांगीं,

खऱ्या आगीनें मीरेला
कण्हण्याचें समाधान
भाव भरतांहि मन     रितें माझें.

खऱ्या व्यथेस साजेसा
मार एक तरी घाव
वाहो माझाहि गौरव     फुटतांना.

# मुक्ता माझी

शतकांशतकांपासून रुसलें
ताटी लावुन बसलें ज्ञान
मनांत कुढते मुक्ता माझी
ओठीं पण तृप्तीचें गान

सुखासीन जरि अंधारांतच
अवचित येतो पूर्वेचा क्षण
मोल कवडिचें मजला देउन
ठेवुन जातो खुपणारी खुण

परवां होता, असे आजही
चिखल उद्यांच्या भाळीं आहे ;
तेजासाठीं झुरणारांची
तिरडीवरती पाळी आहे.

## शेपूटतुट्या

संत, महंत, मुनींचें
वायां गेलेलें जीवन
एका ध्यानाळू सकाळीं
गेलें मला उबजून.

त्यांचें त्यांना सुख नाहीं
आलें माझ्या शांतिआड
कोण्यातरी विठूसाठीं
माझें चेतविलें वेड.

तुटे शेपूट सुखाचें
तैसी जाति मला आली
पंथ आमुचा वाढाया
असा फिरतों बेवाली.

## वठलीहि माती

बाई आणीक माणूस
तसा मुळीं न फरक
एक कूसच अधिक    बाईलागीं.

परी यशोदेच्या कृपे
माझे वादळता स्तन
माझ्यांतून बाळकृष्ण    उमलेल.

ऐसें व्हावें धरेपरी
राहो भलें नभ दुरी
वठलीहि माती तरी    लेकुरावे.

मराठी ग्रंथ संग्रहालय

## ठेच

जी जी लागे ठेच
तें तें माझें ज्ञान
जन सुखासीन ज्याच्याविना.

मरणाचा क्षण
येईतों जगेन
हेंहि माझें स्वप्न कोलमडे.

अंधाराचें सुख
नियती न देई
लाभ तेजाचाहि मृगजळ.

आलों मातींतून
मातींत जाईन
विश्वमनीं मन मेळवून.

ज्याचें त्यास सारें
देऊन परत
व्हावें शून्यवत हीच आस.

घडे न तसेंहि
सारेंच अधुरें
कासाविशी उरे अनिश्चित.

नकळे ही कळा
पुण्य किंवा शाप
उणें पडे माप जीवनाचें.

म्हणून सारखें
पाचोळ्याचें पान
असे वण वण भिरकंडे.

# वेसण

सारे संत होती
माझे नातलग
जेधवां अपंग अनाथ मी.

पानच गाथेचें
एकेक ही भेग
तुला माझा जाब मागतसे.

नाठाळा, किती रे
दडशी दडून
देवाची वेसण भक्ताहातीं.

## हारवतां—

हारवतां माझें मन
दगडांत सांपडतें
ओरबाडतां शेंदूर
आपसूक हातीं येतें.

आतां हारवणें असें
झालें नेहमींचें मना
येथें तेथें दिसतात
त्याच्या लपल्याच्या खुणा.

किती आवरावें मन ?
किती लुचावा शेंदूर ?
एका मनासाठीं घ्यावें
कोणा कोणाशीं मी वैर ?

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...................... वि: ..................
क्रमांक ...................... नों दि ...............

# कोश

अवघेंच जग
रेशमाचा कोश
तुझे प्रेमपाश         माझ्याभोतीं.

हीच माझी धुंदी
जुळावी पुरती
मिळो अळीप्रती     रंगपंख.

## उपकार

किती फेडशील
माझे उपकार
तुला मी आकार   माझा देतां.

दगडांचे भक्त
येतील धावत
माझ्यापायीं गोत   लावावया.

अशा वेळीं ठेव
एक आठवण
राख माझें मन   भाविकाचें.

# मायबाप

गजांशीं जितुकें
खुणावे मैदान
तितुकें हें मन चिडचिडे.

आभाळाची वेणा
सुखावे उदरीं
जन्मते भरारी पंखतुटी.

न तुटे हा नाळ
गोंधळले पंख
तूं मी मायबाप करंट्याचे.

# ओतप्रोत

जीवन सांगाया
गवसली भाषा
कारण या दिशा झांकुळल्या.

झांकुळले बोल
व्याकुळले नाहीं
कान बहिरेहि कान तरी !

सुरांचें थडगें
भरे कांठोकांठ
कान तैसे ओठ ओतप्रोत.

# नको

नको विशाळाशीं नातें
तेथें नभ थिटें होतें
शब्दामध्यें खेळणारी
झेप शब्दांना सोडते.

येथें माझ्यांत मी मावे
तेथें होईल भलतें
नको रूपरंगहीन
ध्यान चालतें – बोलतें.

## अब्रू

दिशा नेसला तयास
घातलें मीं लोटांगण
गाडीभर अब्रू झाली
माझें फिटलां वसन,

# काडीमोड

एक विशाल परम
दुजा खुजा मी अधम
राहे दोहोंचा मुक्काम     एका घरीं.

माझें डबक्याशीं नातें
नाच तिचा मेघोदरीं
अशा सावत्र संसारीं     नाचतांना.

कशा कुठल्या वेडानें
लागे एकमेकां ओढ
करवेना काडीमोड     एकदांची.

## पाहुणा

खाणें पिणें झराझरा
उरीं विचार न बरा
असा आंखूड सोयरा     विठोबाचा.

त्याच्या आठवांत कैसा
घ्यावा शेवटचा श्वास
येथें अजूनहि वास     भाकरीचा.

पुरें कांहींहि घडेना
येथें तेथें मीच उणा
दोन घरींचा पाहुणा     उपाशी मी.

# वाचला मी गाथा

रडला तुकोबा
पानापानावरी
ठाण माझ्या उरीं      बहिऱ्याचें.

मला निष्ठुराशीं
धोंडापण आलें
मन नाहीं ओलें      कशानेंहि.

विठ्ठल होऊन
वाचला मीं गाथा
म्हणोनी या चित्ता      कढ नाहीं.

# दावणीस

फारच उशिरां
आलों दावणीस
सांडणारी कास ओरपाया.

ओळख भुलून
हाणल्यास लाथा
पापणींत व्यथा मिटवून.

किती दावशील
खोटा असा राग
मारकेंहि शिंग स्तनापाडें.

## पावसाळा

आतां थकल्या मनानें
किती उगाळावा वेग
कोरडीच राहे आतां
माझ्या अंकुराची जीभ.

बोबडीच रिमझिम
असा आला पावसाळा
माती माझी भिजवाया
काय मागूं मी आभाळा ?

# धागा

फुटतांच नभाला वाचा
चोंचींतुन गातां रंग
फांदीवर गत जन्मींचे
अक्षरतां सर्व प्रसंग.

असतोस तिथें दिसतोस
दंवनयनीं उन्हाकार
संतांच्या भासाइतुकी
जवळीक तुझी साधार.

पण केशर सरतें–ठरते–
ती मिठीच मावळतीची
'नेती'च्या अंगाईनें
झोपते झेप तेजाची.

*　　*　　*

असतोस असा–नसतोस !
मी असतों असतों जागा
शून्यांत रंग ओवाया
तंद्रीचा शोधत धागा.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................... वि: ..................
क्रमांक .................... नों. दि ..................

# भूत

बाळपणीं कुणि सांगत होतें
चिंचेखालीं भूत राहतो
रात्रीबेरात्रीला तिकडे
चुकूनही मी फिरकत नव्हतों.

आज वाटतें सुज्ञ मनाला
उगीच होतों भीत भुताला
आणिक नाहक हात शिणविला
देव मानुनी त्या दगडाला.

# झेप

झालास माझिया पंखांमधली झेप
त्यासाठीं केलें उडण्याचें मीं पाप.
त्याचेंच मिळालें फळही मजला आज
मी अजून उडतों–उरलें अनंत व्योम
हो विद्ध पंख जरि, अतृप्तच हा जोम.

ठरविलें कितीदां, आवरुनिया मोह
घरकुलांत न्यावा श्रान्त क्लान्त हा देह,
पण माघारी मी वळून बघतों जेव्हां–
हें विशाल नभ मज वदतें उपहासानें;
" तुज कुठलें घरटें ? भाळीं तुझिया उडणें "

मग वारा पिउनी हासत जखमांतून
मी उडतों घ्याया अज्ञेयाचा वेध
या दिगंतराच्या घुमतो घुमटावरुनी
मम सादेजैसा तुझाच का तो साद ?

# मीरा

संध्यामीरा मदीर नयना
वाट पाहते आतुर कातर
येवढ्यांत येईल कन्हैया
रानांतुन या नदीतटावर.

आणिक तिकडे धूळ उडाली
ऐकूं ये गाईंचा हंबर
पांव्याच्या नादास चाखुनी
कृतार्थ झाले अवघे अंबर.

वैशाखांतिल रेतीजैशा
तहानलेल्या साऱ्या गाई
जिभेजिभेनें पिऊं लागल्या
पाण्यामधली नवी नव्हाळी.

संध्यामीरा भान विसरुनी
अंगावरचे भिजवित केशर
गाईंच्या मेळ्यांत धावली
सोडी व्याकुळ नयनांचे शर.

मुळीं न दिसला तिला सांवळा
मीरा लपवी उरांत काहुर
मेघांच्या खडकास रेशमी
रक्त प्रभेचा फुटला पाझर.

मीरा वळली यमुनेवरुनी
रिती तिच्या प्रेमाची घागर,
तोंच मागुनी डोळे झांकत
आला मिस्किल गिरिधरनागर.

# तो

असा अचानक गाभाऱ्यांतुन
झिरपत येतो स्वभाव त्याचा
कालवतां तम तमांत माझें
डोळा खुलतो एकान्ताचा.

मी त्याच्यांतुन फुटण्याआधीं
शेवंतीची होते बाधा
अडल्या श्वासीं उसळत असते
काजळकोन्यामधली गंधा.

धुसमुसळ्या या हव्यानव्याशा
कवेंत असते ऊब उराची
नग्न चांदण्याभवतीं पडते
मिठी त्याची अन् त्याची माझी.

## माझी फुलवणी झाली

डोळे चाखती मोहोळा
संध्यारूपाचा सोहळा
गाणें केशरी झरलें
मन सांध्यमेघ झालें.

आला माणका मोहर
रंगी रंगो माझें ऊर
कसा अंबरीं अंतरीं
झालों केशरी केशरी.

संध्या आली आली ; गेली
माझी फुलवणी झाली
दिवा दिव्यानें लागुनीं
मन उजळलें मनीं.

आतां गगनीं काजळी
रंग माझे माझ्या डोळीं
चेतविता धनी विझें
तेज परी उरे माझें.

## पारधी

नुकते कोठें
दूध-तहाने मुरलीचे स्वर
पिऊं लागले
हंबरणाऱ्या यमुनेलागीं.

पाण्यावरती फुलूं लागली
भिजबिंबा ती मावळतीची.
चराचराच्या छायेमधल्या—
पुसूं लागल्या
अहंपणाच्या हट्टी रेखा.

तोंच झांकशी
        पाझर-पोळे डोळे डोळे...
या कांठाचें ध्यान तुझ्यास्तव
        जुळण्याआधीं
तुझ्या रुपाचा तूंच पारधी !

# चोरी

थवा ढगांचा
होता वेढुन आकाशाला.
तशीच होतीं सुरू कधींची वडीलकीची
चिडकी पिरपिर जलधारांची ;

उन्हपांखरूं धीट खरें पण
पुरतें चकवुन
अलगद चुकवुन नजर ढगांची
बसलें येउन कौलारावर.

" आहेऽबाई ! धीट चोरटा..."
ओली माती वदली लाजत
करीत कौतुक,
ओंगळ चिखलाचेही खुदकन
ओठ हासले.

अशा उन्हाची चाखत गोडी
विहरत होतों ;
आणि अचानक उमगुन कांहीं
सूचकतेनें वाट हासली
तुझ्या घराची.

समोरच्या त्या मंदिरांतुनी
हलके हलके तरळत आली
झुळुक धुपाची.

## वळवाच्या सरी

वळवाच्या सरीपरी
आलों अचानक असा
येरे येरे म्हणतांना
देऊं केलास पैसा

पैसा झाला खोटा
पाऊस आला मोठा.
पाऊस पण फसला नाहीं
पैशासाठीं रुसला नाहीं.

## उरलेलें

खरखणारी उभी पहाडी
अडखळली सरितेची नाडी
वाळूवर पण थोडी थोडी
उरली आहे ओली गोडी.

पिंगट राईवरूनी ढळलें
सौंदर्याचें हिरवें वर्णन
झवल्या छायेमधें परन्तु
पाचोळयाचें मधु संकीर्तन.

ग्रीष्म-वायुच्या झुळुकीमाजी
शीतळतेचा अमृत ठेवा
पुण्यविरांच्या स्मशानांतही
'ओम् शांति 'चा मंत्र करावा !

गेलें वैभव, उजाडलें वन
तूं कोठुन पण हसतो आहे
उरल्यासुरल्या सुंदरतेला
कोणासाठीं राखत आहे ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों वि ..............

# उरतें गाणें तरी

झुळझुळ वारा, वाऱ्यामधुनी वाहे गोदावरी
गंधगर्भ गारव्यांत गाती सावनभावन सरी
पद्मपंख पारवा पांढरा पुष्पापरि अंबरीं
पाचोळा परिसतो पोवळ्या पानांतुन पांवरी

पुलक पाचुचीं पातीं, पिवळें प्रेम उन्हाच्या उरीं
ओघळलेली वैजयंति जणुं दवांत शोधी हरी
प्राचीच्या कंठीं मेघांची रंगावळ गळसरी
त्या रंगांतुन, गंधरवांतुन उगवे मम वैखरी.

पहाटलेलें गीत होत मग झगमग पाण्यांतली
गहनगोड गाण्यांत थांबते तगमग प्राणांतली
जीवाच्या नाभींतुन उधळे शिवभावी कस्तुरी
गाण्यांतुन जरि गाणें झरतें – उरतें गाणें तरी.

# रामघटीला

नारिंगाच्या रसांत जेव्हां
डोंगरमाथा भिजला होता
फांदीवरल्या घरट्यांमधली
चिवचिवली अन् मुग्ध शांतता.

वरधेच्या लहरीसम मंजुळ
वाहत होता चंदनवारा
उरल्यासुरल्या काळोखासह
विरघळला शुक्राचा तारा.

मन्मन चेतन तेव्हां होउन
गर्भवती कार्तिकसृष्टीसम
शिकूं लागलें वाऱ्यामधली
अंगाई मंगल हृदयंगम.

मेघांच्या दोल्यांतुन जेव्हां
झुलूं लागले किरण कोवळे
नभासारखें विशाल होउन
अंतर फुललें केशर - पिवळें.

अशाच कोण्या प्रात:काळीं
कृष्ण निघाला असेल रानीं
गोधन उधळत जातां आला
पांव्याचा रव माझ्या कानीं.

त्यावेळीं अंतरास पटलें
राम जाहला, कृष्ण जाहला
रामघटीला – गोपघटीला
अंश तयांचा मीं अनुभवला.

# पीरवाडी

अजुनही पुरेसें उजाडलेलें नव्हतें
पाऊल मेहेंदीमधें रंगावित लाल
लाजरे शहाजादीचे कोण्या गाल
वाऱ्यांतुन भासत, क्षितिजीं हासत नव्हते.

तो मुअज्जीनही अजून उठला नव्हता
देऊन बांग मारीत इलाहिस हांक
मक्केस जाउनी मना कराया पाक
त्या हाजीमधुनी कुणी जागला नव्हता.

पण रस्त्यावरच्या धुळींत तांबुस पिवळ्या
विरहार्त ढगांची पदें उमटुनी होतीं
त्या मातीमधुनी गाती कोणी गीती
अडखळत कांहिंशी कथा मनाची भोळ्या.

त्या हुरहुरणाऱ्या तशा काजळ्या वेळीं
'आ' वांसुन बसली होती एक विहीर
जणुं श्वास रोखुनी जडावलेलें नीर
डोळ्यांत थांबवित विस्कटलेल्या ओळी.

अन् विहिरीजवळी दूर जराशी एक
कांठापुन निखळुन पडलेल्या गोठ्यांस
निरखीत कधींची बाभुळ संथ उदास
सांभाळित होती वार्धक्याचा वांक.

पलिकडे दिठीच्या अनार तिष्ठत होते
कळकीचें पिंगट बेट एकलें मूक
अल्लास्तव झुरणारांचा पाहत शोक
तुटलेल्या पंखांजैसें उडवित पातें.

ती सुतकी माती झांकत अंग तृणांत
थडग्यांचीं अंडीं उबवित बसली होती
तडफडत सारखी किती दिवस अन् राती
तिज वेडी आशा येइल जीव शवांत.

पैगंबर वारा पाहत होता वाट
तो आफताब घेऊन खड्ग तेजाचें
धर्मास्तव येइल घ्याया घोट तमाचे
दावीत जगाला जहन्नतीचा थाट.

येईल पांढऱ्या अश्वावरती दूत
इब्लीस बातमी महंमदाची देत
पण ...
अजुनही पुरेंसें उजाडलेलें नव्हतें.
अजुनही पुरेंसें उजाडलेलें नव्हतें.

# अकाळणी

मन हें झालें एक शिंपली
सागर व्यापुन तळमळणारी
स्वातीच्या मेघाचे मोती
अंगास-आठव सांठवणारी.

देहाची बेभान काहिली
चोंच वांसुनी कुढे निरंतर
धूळ नभाच्या कानीं सांगे,
‘ उलढ्या डोक्याचा हा सागर ! ’

आभाळाची शेंग उलावी
आजच गळतो थेंब उद्यांचा.
चोंच व्यथेची टिपते दाणा
अकाळणीच्या मृद्गंधाचा.

# गजरा परका

अवस–फुलांची नभांत उमलण
कोमेजाया कोण कुणाचें ?
विनाचुड्याच्या हातीं घागर
निमित्त केवळ तम भरण्याचें.

टिचतांना जळ अभंग डोळे
या रेतीशीं नातें नाहीं
अशी ओवल्ये गजरा परका
सुइ टोचते श्वासांनाही.

# मोतीपोहे

सुपभर मोतीपोहे
जुन्या कथेची पापणी
अनोळखी सवतीची
घळे डोहाळ विराणी.

सडा लवंगादोड्यांचा
झडे नवतीचें फूल
तमीं भेटलों दोघीहि
एक - डंख, एक - भूल.

तिचें शिळेंपण आतां
फडफडे माझ्यांतही
त्याच्या प्रीतीची सांगता
ज्याचा अंतपार नाहीं.

रांग शापित भाळांची
मीहि स्वातिहीन शिंप
तिचे माझे एक झाले
मोतीपोहे सूपोसूप.

# हवेंहवेंसें

रखरखलेल्या कौलांवरती
अकाल शिरवा नाचत मारी
गार थापटी
आज धरेवर फुलला डुलला
पुलक पोपटी.

घन श्याम पाहुनी अंबरीं
उभारला हा मोरपिसारा
धन्य धन्य ती झाली मीरा
तृष्णेची ओंजळी भरे; अन्
ओल्या डुलकिंत वितळे वारा.

हवेंहवेंसें घडलें आहे!!
घडावयाला हवेंच होतें.
हेंच घडावें असेंच कांहीं
मनांत माझ्या दडलें होतें;
त्यास्तव मन तडफडलें होतें.

हवेंहवेंसें घडावयाला हवेंच होतें –
(ग्रीष्मानें पण इतुक्या लवकर
विझावयाला नकोच होतें
घायकुत्या हौसेंत येवढ्या
मोर मिरेनें, मातीनेंहि
भिजावयाला नकोच होतें.)

हवेंहवेंसें घडावयाला हवेंच होतें.
निर्माल्यानें फुलावयाला हवेंच होतें.
(तरिही तरिही इतुक्या लवकर
नकोनकोसें भुलावयाला
नकोच होतें.)

# हवेंहवेंसें

रखरखलेल्या कौलांवरती
अकाल शिरवा नाचत मारी
गार थापटी
आज घरेवर फुलला झुलला
पुलक पोपटी.

घन श्याम पाहुनी अंबरीं
उभारला हा मोरपिसारा
धन्य धन्य ती झाली मीरा
तृष्णेची ओंजळी भरे ; अन्
ओल्या झुलकिंत वितळे वारा.

हवेंहवेंसें घडलें आहे ! !
घडावयाला हवेंच होतें.
हेंच घडावें असेंच कांहीं
मनांत माझ्या दडलें होतें ;
त्यास्तव मन तडफडलें होतें.

हवेंहवेंसें घडावयाला हवेंच होतें –
( ग्रीष्मानें पण इतुक्या लवकर
विझावयाला नकोच होतें
घायकुत्या हौसेंत येवढ्या
मोर मिरेनें, मातीनेंहि
भिजावयाला नकोच होतें. )

हवेंहवेंसें घडावयाला हवेंच होतें.
निर्माल्यानें फुलावयाला हवेंच होतें.
(तरिही तरिही इतुक्या लवकर
नकोनकोसें भुलावयाला
नकोच होतें.)

## डहाळी

टळे न त्याच्यापुढें वांकणें
परन्तु नाहीं माझ्या भाळीं
वाऱ्याची नसतांहि चिथावण
झुलतच आहे एक डहाळी.

## गुढी

कैक सकाळीमधें मनाच्या
बिदोबिदीं रंगल्या
रक्त आटल्या फिक्या भावना
नशिबासम मावळल्या.
काळ्यामागुन गोऱ्या, काळ्या
चक्रगतीनें रात्री आल्या
आधींच्या ठरलेल्या,
हळूहळू अन् अपंग झाल्या
वृत्ती ताठरलेल्या.

तरिही जपते उघडी रेती
जळास सुरकुतलेल्या !
कळून सारें, पुन्हां कातडें—
ओढुन डोळ्यांवरती
धूर उद्यांचा अडवायाला
कौलारावर उगारलेली
गुढी पाडव्याची.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळक्रम
अनुक्रम ........................ वि: ..............
क्रमांक ........................ नों दि ..............

## पहाट न्हाते

प्रसन्न रंगित स्वप्नें जैसीं
नभीं खेळती भाव मोकळे
पोक्त जराशी दिसते हिरवळ
दरवळतें पण बाल्य कोवळें

हसे बाळसें प्राचीमधलें
उन्ह गुलाबी लाज लाजते
चैतन्याचे पैंजण ऐकत
गवत मनाचे दंवांत भिजतें

पानांमधुनी वारा गाई
धिम्या सुरानें प्रातःसूक्तें
नम्र शांत लहरींत नदीच्या
पाजामधली पहाट न्हाते

## बांध

नाहीं अवसेची रात
नाहीं चांदण्याची रात
नाहीं आशा ; निराशाही
गगनाच्या परडींत
नाहीं मनांत शिरत
गोड कडू आठवणी
हासण्यास रडण्यास
नाहीं सांगणारें कोणी.
जागणाऱ्या पापणींत
नाहीं लपलेली धुंद
आंसवें न फोडतील
माझा मिटलेला बांध.

# अंगाई

जग सारें झोपलेलें
जागा एक रातकिडा
अंधारांत आडोशाला
किरकिर करी वेडा.

एकान्तांत सळसळ
वृक्षलता हालतात
सुकलेलें मन गळे
खिन्न पानांच्यासोबत.

दाटलेले ढग कधीं
हळूहळू पांगतात
आणि नभींचा काळोख
खालीं येई अधिकच.

दूर कोठेंतरी रानीं
मनांतली कोल्हेकोई
पाळण्यांतल्या जीवना
गातें मरण अंगाई.

## अंगाई

जग सारें झोपलेलें
जागा एक रातकिडा
अंधारांत आडोशाला
किरकिर करी वेडा.

एकान्तांत सळसळ
वृक्षलता हालतात
सुकलेलें मन गळे
खिन्न पानांच्यासोबत.

दाटलेले ढग कधीं
हळूहळू पांगतात
आणि नभींचा काळोख
खालीं येई अधिकच.

दूर कोठेंतरी रानीं
मनांतली कोल्हेकोई
पाळण्यांतल्या जीवना
गातें मरण अंगाई.

## आढावा

घेई वर्षांचा आढावा
फळें कर्मांचीं मोजत
फाल्गुनाच्या पायापाशीं
बसे पाचोळा कण्हत

पुरा जाहला हिशेब
पोकळीनें भरे ऊर
पिसाटली वावटळ
धूळ घेई अंगावर.

रान हिरवेपणास
हळूहळू विसरावें
तैसीं माझीं पापपुण्यें
बारा महिन्यांच्या नांवें.

# अंधुक

दिवसाच्या पंखांसह
दमलेलें कमल मिटे
गगनाच्या शेजेवर
तार्‍यांचा साज नटे.

म्लान रात्र, शिथिल गात्र
जलपात्रीं तम दाटे
कोणा शोधीत नेत्र
वेड्यासम पळत सुटे.

संथ शांत यमुनातट
कोणाचा ये आहट
क्षीण हासऱ्या जलांत
आर्त संगमर्मरात.

साद नसे—भास एक
करते मुमताज शोक
शृंगारासह अंधुक
तो रिताच नभ-मंचक.

# झिंग

अशी कशी झिंग बाई
  शृंगारच नाहीं.
चंदनाचें टिंब नाहीं
  अंगाराची लाही

मनाभोतीं तशीच ही
  देहाची काचोळी
तंगोनिया तटातटा
  तुटतच नाहीं
यौवनाचा पाय पोरी !

  उरीं वाजतांहि
लाजमिट्या डोळीं नाहीं
  गुलाबी रांगोळी
मुक्या पैंजणांचे ओठ
  रुततात पायां
कान्ह्याविना नाचतांना
  अडे माझी काया.

कोसळत्या रातीखालीं
उल्का वेचतांना
मला कधीं गवसेल
आभाळींचा राणा ?

सुटेल का आंबाडा ग
अंबाडीच सैल ?
सुन्या सुन्या प्राजक्ताचें
चांदणें विझेल.

## श्रावण

आतां माझ्याहि गांवांत
आला असेल श्रावण
अस्सें अस्सेंच फुललें
असणार माळरान.

आलें असेल बाळसें,
वातडल्या वासरांना
चिखलांत लेकरांचा
चालू असेल धिंगाणा.

वडाखालच्या दुकानीं
लोक मांडणार ठाण
'लय जोराचा पाऊस
नाहीं वागत निंदण.'

मारुतीच्या देवळांत
हरीविजयाची कथा
कसा भाबडा हरीख
किस्न कंसास मारता.

माझ्या आडोश्या खेड्यांत
वरधेच्या विळख्यांत
खास भुलेल श्रावण
त्याची निघण्याची रात.

# गढी

जख्ख युगाच्या बोळक्यांतली
किडलेली जणुं दाढ गढी ही
तिच्या मढ्यावर इतिहासाचें
घुबड अमंगल बोलत राही.

मनामनाचें वटवाघुळ हें
झगडत उलटें लोंबत राही
कुबड्या निंबाच्या रोखानें
कधीं किलकिला उडून जाई.

अवसेला वेताळ कुणीसा
गुप्त धनाचें राखण करतो;
मोगलाइचा चाखत आठव
पायथ्यास कुणि पीर नांदतो.

रित्या मनापरि खुडक कोंबडी
उकीरड्याला उबवित असते
तोल सावरित तसा बुरुज हा
जुन्या पिढीचें ढेकुळ खचतें.

# झिंग्या भोई

अवसेच्या रात्रीं तर अधिकच
झिंग्या भोई झिंगत असतो
लावणींतल्या निळावतीला
व्यथा आपुली सांगत असतो.

रात असो वा दिवसां ढवळ्या
झिंग्या आपुल्या धुंदित असतो
एक बाटली-दुसरी, तिसरी,
चवथीलाहि धुंडित असतो.

वरधेच्या आषाढ-पुरापरि
गढूळ जब्बर व्यसन वाढतें
झिंग्या झिंगत राहणार हें
अहो शेंबडें पोर ताडतें.

कोणाच्याही उपदेशाचा
सुजाणतेच्या दो शब्दांचा
झिंगूवरती अंमल नाहीं
( दारूच्या थेंबाइतुकाही ! )

* * *

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ...
अनुक्रम ........................ वि: ..............
क्रमांक .......................... नों दि ..............

पूर्वीं त्या तंगीच्या सालीं
पिंणं जरा दावणींत होतें
कमाइचे खुद गंडे तेव्हां
झिंग्याच्या कमरेंतच होते.

कारभार खुश होता तेव्हां
झिंग्याच्या डोंग्याची चलती
काट सावरी नाव शेंदरी
दिसे नदीवर दिमाख-डुलती.

गांवांतिल गप्पांत गवगवा
झिंग्याचें म्होतूर व्हायचें
जोरावरती नशीब होतें
डोमा भोयाच्या रेनीचें.

पहिली बाइल लग्नाची जी
हळदीच्या डागावर गेली
तेव्हांपासुन तशीच होती
जळती जाणिव जवानींतली.

म्होतुर-वेडा खुशदिल झिंगू
किती मनसुबे रचीत होता
स्वप्नांतिल पाटाची नवरी
वल्ह्यानें थोपटीत होता.

आला होता योग असा ; पण
देवच जाणे कोठें अडलें
फूस कुणा फुरसाची झाली
डोमानें तें गांव सोडलें.

नावेच्या कांठागत कणखर
रेडा जणुं झिंगू ओरडला
पाणपुराचा लोंढा भक्कम
ओघ तिथें नाल्याचा अडला.

गांवकरी तर देती ग्वाही
पहिला झिंगू मसनीं गेला
थै थै नाचत उणे चिताया
'या झाडाले भूत लागला.'

झिंग्यानें तर ताळ सोडला
जपूं लागल्या पोरीसोरी
तमाशांतल्या शिरिकिसनापरि
भर वाटेवरि करि शिरजोरी.

अहो, कुणाची बिशाद काय ?
कुण्या नराची व्याली माय ?
बोलिल उलटुन शब्द एकतरि—
झिंगूशीं का अशी मुजोरी ?

पक्कें ठावें पोरींना कीं,
झिंगूला कांहींही खुपतें
बकरीचें दिसणेंही नुसतें,
मस्त लांडग्याला नच खपतें.

झिंग्याच्या बेपर्वाईला
आसपास ना तोड कुठेंही
डोळ्यांदेखत कुणी मरो ; पण
सुतक त्यास बापाचें नाहीं.

११९६९

पोट जाळण्याला झिंग्याचें
वाट चुक मग कुणी कोंबडी;
शोधत जाणाराला दिसते
नदीकांठची रेव तांबडी.

असें सारखें मग झिंगूचें
महूफळागत जीवन सडलें
'हातकाढणी'च्या सटवीचे
खंडाऱ्याशीं नातें जडलें.

कुणी वऱ्हाडी मंडळ आलें
वाजत गाजत वरधेकांठीं
कुठें न डोंगा दिसे तयांना
पैल थडीवर जाण्यासाठीं.

रोषानें फुगलेली वरधा
रोखत शिंगें सर्व जगावर
डाकीनीनें झपाटलेलें
भरतीचें हें वेड अनावर.

फुत्कारत जणुं नागिण चाले
खडक फोडते धार कर्वती
सूड सूड सोसाटत होता
गढूळ उर्मट लाटांवरती.

तरून जावें पाणी कैसें
'भलकशीच पंचाइत होती!'
उतार त्या भरतीस पडेतों
गोरज घटि लग्नाची टळती.

येवढ्यांत धुंदींतच अपुल्या
झिंगत झिंगत झिंग्या आला
डोंग्याचा नावाडी पाहुन
वाजंत्रीचा सूर उमटला.

लग्नाची ती गर्दी पाहुन
झिंग्याचें मन भरून आलें.
आठवणींच्या भडक्यामधुनी
पिशाच्च कोणी पुन्हां पेटलें.

'घाई, घाई, लगीनघाई !'
शब्दांना वेडावित हसला
हसण्याच्या दुःखाचा विंचू
झिंग्याच्या काळजास डसला

अव्वाच्यासव्वा मोबदला
झिंग्याचा सूडाचा सौदा
'पट्ठा नाहीं सोडायाचा
दर डोईला रुपया बंदा.'

रुपया दर ऐकुनि दरडोई
झिंगूच्या पायावर आली
"छळूं नको बा भोईराजा
तूंच अतां लग्नाचा वाली"

"लग्नाचा वाली लोकांच्या!
संसारीं माझ्याच निरवारा!
मी ना लष्करचा सैपाकी—"
चढूं लागला त्याचा पारा.

आतां तर हे बेज्या झाली !
सुचे न कांहीं कोणालाही
खिनाखिनानें मुहूर्त टळतां
अंगाची होणारच लाही.

" झिंग्या, नंग्या अडवुन घरशी
रिपोट मी ठेसनांत करतों
बघशी ना जर मानुसकी ले
चंभाराचा देव पूजतो

धमकीची मात्राही फुसकी
" बलाव जाबे पोलीसाले;
रिपोटाचिही ऐसी तैसी
मोट्ठे लागुन गेले साले."

" ध्यान पहा या शिवराळाचे
दारूड्याची छाती संदुक !"
मुठी वळवुनी झिंग्या बोले,
" परी पहा गब्रूची बंदुक."

खिनभरांत थुतरात खाउनी
ध्यान पाहणारा आदळला
खी खी करुनी हसला भोई
हसून थकला, पचकन् थुकला.

आतां अपुली उडेल चटणी
झिंग्यालाही ठावें होतें
धावे तीरागत, डोळ्यांचे
लवतें ना लवतें तों पातें.

झुडुपामध्यें लपून झिंगू
पुसूं लागला घाम जरासा
ऐकूं ये आवाज डब्बकन्
पाण्यामध्यें पडलेल्याचा.

भोयाला तर अपरुप दिसलें
लग्नाची घटि साधायातें
वऱ्हाड अर्धे क्रुद्ध जळावर
वायां थपडा हाणीत होतें.

अर्धशिके ते पोहत सारे
पुन्हां पुराचा लोंढा आला
पाण्याचा तर स्वभाव तिरसट
भरतीचा अंदाज कुणाला?

पुढलें भीषण चित्र झांकण्या
भोयानेंही डोळे मिटले
मागें उरलेल्या लोकांच्या
रडण्यानें तर कानच फिटले.

हिवरावरचें घुबड सांगतें
खुज्या पिंपळाच्या मुंज्याला,
"मुसंडीत डुक्कर पाण्याच्या
लग्नाआधीं नवरा मेला"

*    *    *

नदीकांठच्या वाटसराला
अवसेला तें दिसतें सारें–
पुरांत वरधेच्या बुडणारे;
कांठावरचे ओरडणारे.

डोह राखत्या वेताळाला
जाग आणतो लोंढा भेसुर
लग्नाच्या तालावर गातो
ओंगळ गाणीं कर्कश बेसुर.

लग्न! लग्न! किंचाळत हासत
ताशे बडवी चुडेल कोणी
घटी साधण्या कितीक प्रेतें
पुरांत तरती चिडवित पाणी.

दगड दिलाचा कठोर झिंगू
त्याला मग खटकतें कुठें तरि
सुन्नपणा लपवाया घेतो
एक बाटली दुसरी, तिसरी.

भयान भवतीं वरतीं चढते
डोमाच्या रेनीची कांति
नशेंत चढत्या गात्रीं येते
प्रेतावरची अपंग शांति.

म्हातारे-कोतारे सारे
तरणे ज्यांच्या छातिस माती
तेही डरती वरधेवरती
फिरकाया अवसेच्या रातीं.

अवसेच्या रात्रीं हा ऐसा
लग्नाचा जल्लोस चालतो,
लावणींतल्या स्वप्नांशीं अन्
झिंगूचा एकान्त बोलतो.

# अंगारा

येऊं दे आगींत
आगीचा दिमाख
भरपूर राख.
माझ्या वादळांत
भव्य भरो अर्थ
जग दिसो व्यर्थ
मिटवो निखारा
तुझ्या कृपावारा
माझा मी अंगारा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम .................... विः ......
क्रमांक .................... नों. विः ..............
REFBK-0011969
REFBK-0011969
मराठी ग्रंथ संग्रहालय
११९६९
१०७

# पॉप्युलर प्रकाशन

**मंगेश पाडगांवकर**

- जिप्सी
- छोरी
- शर्मिष्ठा

**विंदा करंदीकर**

- मृद्‌गंध
- धृपद
- राणीची बाग

**वसंत बापट**

- सेतु

**पु. शि. रेगे**

- पुष्कळा

**सदानंद रेगे**

- अक्षरवेल
- गंधर्व

**कुसुमाग्रज**

- मेघदूत

पॉप्युलर प्रकाशन

६१

आजचें मराठी काव्य आपल्या उदंड परंपरेला पारखें होत आहे अशी हाकाटी बऱ्याच वेळां ऐकूं येते. परंतु परंपरेला चाकोरी न मानतां, गेल्या सहासात शतकांतल्या पूर्वसूरींच्या अजरामर काव्याचे इष्ट ते संस्कार स्वीकारणारे असेहि कांहीं कवि आज मराठींत आहेत. अशा खऱ्या अर्थानें परंपरापुष्ट आणि तरीहि स्वतःचीं अनेक वैशिष्ट्यें कवितेगणिक उलगडून दाखविणाऱ्या नव्या कवींत मधुकर केचे यांचें स्थान अतिशय महत्त्वाचें आहे. संतांची गाथा, पंतकवींचें अलंकारप्रचुर काव्य आणि चांगल्या कवितेला प्राणवत् असलेला प्रसाद व आशयघनता विदर्भातल्या या तरुण कवीच्या लेखणींत भरपूर आहे.

रडला तुकोबा
पानापानावरी
ठाण माझ्या उरीं बहिऱ्याचें

असें हा कवि नम्रतेनें म्हणतो खरें परंतु या ' पुनवेच्या थेंबां 'त भक्तिभावाबरोबरच भावच्छटांची विविधतासुद्धां प्रतिबिंबित झालेली आहे असें वाचकाला आढळून येईल.

समजण्यास सोपी परंतु तरीहि पुनःपुन्हां वाचावीशी वाटणारी ही व्यक्तिनिष्ठ कविता. प्रा. केच्यांच्या ' दिंडी गेली पुढें ' या पहिल्या काव्यसंग्रहाचा राज्यसरकारचें पारितोषिक मिळून योग्य तो गौरव झालाच होता. त्यानंतर काव्यपंढरीच्या या आधुनिक वारकऱ्याच्या दिंडीनें बरीच मजल गांठली आहे असेंच चोखंदळ वाचकांचें मत पडेल.